[redacted]

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

फेब्रुवारी २१, २०१२
*(ऑगस्ट १०, २०१२ रोजी सुधारित)*

**शहीद भगतसिंग ह्यांच्या जन्मशताब्दी निमित्त नाणी दिली जाणे.**

भारतीय रिझर्व बॅंक, लवकरच, पुढीलप्रमाणे आकार, डिझाईन व धातुमिश्रण असलेली रु. ५ ची नाणी देऊ करील.

| मूल्य | आकार व बाह्य व्यास | खाचांची संख्या | धातु-मिश्रण |
|---|---|---|---|
| पाच रुपये | वर्तुळाकार सिक्युरिटी कडेसह २३ मिलीमीटर | -------- | फेरिटिक स्टेनलेस स्टील८३% - क्रोमियम - १७%. |

डिझाईन

| मूल्य | दर्शनी बाजू | मागील बाजू | सिक्युरिटी कडा |
|---|---|---|---|
| पाच रुपये | नाण्याच्या पृष्ठभागाचे दोन आडव्या रेषांनी तीन भाग केलेले असतील. मध्य भागातील डाव्या बाजूस अशोक स्तंभावरील सिंह मुद्रा व तिच्या खाली सत्यमेव जयते लिहिले असेल. मध्य भागातील उजव्या बाजूस, आंतरराष्ट्रीय अंकात त्या नाण्याचे ५ हे मूल्य दिले असेल. वरच्या भागात हिंदीमध्ये भारत व इंग्रजीत INDIA हे शब्द असतील आणि खालच्या भागात, हिंदीमध्ये रुपये व इंग्रजीत RUPEES हे शब्द असतील | ह्या भागावर, डावीकडील कडेजवळ **"SHAHEED BHAGAT SINGH",** आणि शहीद भगत सिंह जन्मशती हे शब्द असतील आणि उजवीकडील कडेजवळ इंग्रजीमध्ये " SHAHEED BHAGAT SINGH BIRTH CENTENERY" हे शब्द असतील. प्रतिमेच्या खाली, आंतरराष्ट्रीय अंकात, १९०७ २००७ हे वर्ष दिले असेल | ह्या नाण्याच्या कडेवर सुरक्षा-खाचा केलेल्या असतील. किनारीच्या मध्यभागी, एक उथळ खोबण ठेवलेली असून, त्यात दोन रित्या जागांच्या दरम्यान एक डिझाईन असेल. हे डिझाईन म्हणजे, मण्यांची माळ असेल व प्रत्येक मण्यानंतर एक तिरपी रेषा असेल. असे एकूण ३० मणी व ३० रेषा असतील. |

ही नाणी, इंडियन कॉईनेज अधिनियम, १९०६ अन्वये वैध चलन असतील. ह्या मूल्यामधील विद्यमान नाणीही वैध चलन असणे सुरुच राहील.

**अजित प्रसाद**

सहाय्यक महाव्यवस्थापक

**वृत्तपत्रांसाठी निवेदन २०११-२०१२/१३३८**